**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार .

- प्रधानमंत्री दोन दिवस गुजरातच्या दौऱ्यावर/ केवडिया इथं विविध विकास प्रकल्पांचं आणि एक भारत श्रेष्ठ भारत संचलनाचं करणार उद्धाटन

- चीनवरचं आयात शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्के इतकं कमी करण्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

- अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनं केली व्याजदरात पाव टक्के कपात

आणि

- आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत  आज भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सामना नवी मुंबईच्या डी वाय पाटील स्टेडीयमवर रंगणार

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिनाचा सोहळा देशभरात साजरा होणार  आहे. केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयातर्फे देशभरात रन फॉर युनिटी म्हणजेच एकता दौडीचं आयोजन करण्यात येत आहे. तसंच एकता दिनानिमित्त गुजरातमधे केवडिया इथं विशेष कार्यक्रम होणार आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत होणाऱ्या संचलनाच्या धर्तीवर केवडिया इथं स्टॅच्यू ऑफ युनिटी या सरदार पटेल यांच्या स्मारकापासून विशाल संचलन आयोजित करण्यात आलं आहे.  एक भारत श्रेष्ठ भारत संकल्पनेवर आधारित या संचलनाचं उद्धाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानिमित्त एका टपाल तिकिटाचं प्रकाशनही करतील.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पाटणा इथं पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. येत्या १ नोव्हेंबर पासून १५ नोव्हेंबर पर्यंत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती दिनी

म्हणजेच जनजातीय गौरव दिनापर्यंत भारत पर्व साजरं केलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर जाणार आहेत. केवडिया इथल्या एकता नगरमध्ये विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकांसाठी सर्वपक्षीय प्रचार सुरू आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि महाआघाडीचे नेते मतदारांना आकर्षित करण्याचा  प्रयत्न करत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी, अमित शहा तसंच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा आज बिहारच्या विविध भागात प्रचारसभा घेत आहेत. बिहारमध्ये मुजफ्फरपूर इथं नरेंद्र मोदी यांनी प्रचारसभा घेतली. यावेळी त्यांनी राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेसवर टीका केली. जिथे बंदुकीचा धाक आणि क्रौर्य असतं तिथे कायद्याचं राज्य अस्तित्वात नसतं, असं मोदी यावेळी म्हणाले. भाजपा नेते अमित शहा यांची लखीसराय इथं प्रचारसभा झाली. या सभेत त्यांनी लालू प्रसाद यादव यांच्यावर टीका केली.

भाजप मतांसाठी बिहारचं शोषण करून गुजरातमध्ये उद्योग स्थापन करत असल्याची टीका महाआघाडीचे नेते तेजस्वी यादव यांनी केली आहे. बिहारच्या जनतेनं एकत्र येऊन रालोआला सत्ताधारी होण्यापासून रोखण्याचं आवाहन तेजस्वी यादव यांनी केलं आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १२१ विधानसभा मतदारसंघांत ६ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

<><><><><>

जहाज बांधणी आणि नौवहन क्षेत्रात भारताने पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केलं आहे. ते आज मुंबईत भारत नौवहन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वास्को द गामा भारतात पोहोचण्यापूर्वी अनेक वर्षांपासून भारतीय व्यापारी समुद्रमार्गे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते असं ते म्हणाले. अमृतकाळात नौवहन क्षेत्रातल्या भारतीय पारंपरिक ज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे असं आवाहन त्यांनी केलं.

भारतीय नौवहन क्षेत्रातल्या अग्रणी महिला कॅप्टन जे सी आनंद यांचा मांडवीय यांनी सत्कार केला.

<><><><>

सेल अर्थात स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया लिमिटेडने चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या सहामाहीतली आकडेवारी जाहीर केली आहे. त्यात कच्च्या पोलादाचं उत्पादन ९५ लाख टनांवर कायम राहिलं असून विक्रीत १६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांची वाढ झाली आहे. विक्रीचं प्रमाण वाढल्यामुळे एकूण महसूल ५२ हजार ६०० कोटींहून अधिक झाला आहे. गेल्या वर्षी याच काळात हा महसूल ४८ हजार ६७२ कोटी रुपये इतका होता. त्यात यंदा वाढ दिसून आली आहे.

<><><><>

देशभरातल्या १८ प्रकारच्या वजनं आणि मापन उपकरणांच्या तपासणीची प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि सोपी करण्यासाठी केंद्र सरकारने मेट्रोलॉजी नियम २०१३मध्ये सुधारणा केल्या आहेत. त्यामुळे जलमापक, उर्जामापक, वायूमापक, आर्द्रता मापक, वेगमापक आणि उष्णतामापकासारख्या उपकरणांची तपासणी सरकारमान्य परीक्षण केंद्रामधेच होणार आहे.

<><><><>

अमेरिकेनं चीनवर लादलेलं आयात शुल्क सध्याच्या ५७ टक्क्यांवरून ४७ टक्के इतकं कमी केल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज घोषित केलं. दक्षिण कोरियामध्ये बुसान इथं चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीनंतर त्यांनी ही माहिती दिली. चीन अमेरिकेडून सोयाबीनची खरेदी तात्काळ सुरु करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. दुर्मीळ खनिजांचा प्रश्न सोडवण्यात आला असून, चीनमधून होणाऱ्या दुर्मीळ खनिज निर्यातीत आता कोणताही अडथळा येणार नाही, असं ते म्हणाले. चीनवर लावलेलं रासायनिक पदार्थांवरचं सीमाशुल्क २० टक्क्यावरून १० टक्क्यावर आणल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

चीनचा विकास हा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'  या दृष्टिकोनाशी सुसंगत असल्याचं चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी म्हटलं आहे.

दक्षिण कोरियामध्ये बुसान इथं आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर आज दोन्ही नेत्यांची भेट झाली. त्यानंतर ते बोलत होते.

**<><><><><>**

अमेरिकेची मध्यवर्ती बँक, फेडरल रिझर्व्हनं आपल्या कर्जावरच्या व्याजदरात पाव टक्के कपात करून ते ३ पूर्णांक ७५ शतांश ते ४ टक्के दरम्यान राखण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. व्याजदर कपातीमुळे प्रमुख कर्ज दराचं उद्दिष्ट तीन वर्षांच्या नीचांकी पातळीवर आलं आहे. त्यामुळे अमेरिकेत कर्जावरचा खर्च कमी झाला आहे.

अमेरिकेतलं सरकारी कामकाज महिनाभर बंद राहिल्यामुळे केंद्रीय बँकांना कामगार बाजारपेठेबद्दल अधिकृत डेटा मिळायला विलंब झाला आणि त्यामुळे ही कपात झाल्याचं अर्थतज्ज्ञांचं मत आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या संरक्षण विभागाला, म्हणजेच युद्ध विभागाला चीन आणि रशियाच्या बरोबरीनं अण्वस्त्रांची चाचणी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. अमेरिकेनं यापूर्वी २३ सप्टेंबर १९९२ रोजी ‘डिव्हायडर’ या सांकेतिक नावानं अण्वस्त्र चाचणी केली होती.

**<><><><><>**

मोंथा चक्रीवादळाचा जोर आता कमी झाला असला तरी त्याच्या प्रभावामुळा देशाच्या विविध भागात पाऊस पडत आहे. आंध्रप्रदेश, ओदिशा आणि पश्चिम बंगालच्या काही भागाला याचा फटका बसला आहे.

महाराष्ट्राच्या सोलापूर, पुणे, चंद्रपूर, नागपूर, वाशीम आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होत आहे.

झारखंड, छत्तीसगड आणि मध्यप्रदेशात तापमानात घट झाली असून अनेक ठिकाणी जोरदार पाऊस होत आहे. आणखी चार दिवस या वादळाचा प्रभाव कायम राहील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

कोकण, गोवा, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, पूर्व राजस्थान, ओदिशा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातील प्रदेश आणि मध्यप्रदेशात आज मेघगर्जनेसह वादळी वारे वाहतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

आर्य समाजाचे संस्थापक महर्षी दयानंद सरस्वती यांच्या पुण्यतिथीनिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज त्यांना अभिवादन केलं. महर्षी दयानंद सरस्वती यांनी वेदांचे ज्ञान सर्वसामान्य लोकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचवून अविस्मरणीय भूमिका बजावली आहे, असं शाह यांनी एका संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने  या आठवड्यात १३ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे अमली पदार्थ आणि आणि इतर वस्तू जप्त केल्या.  वेगवेगळ्या वेळी केलेल्या कारवाईत अधिकाऱ्यांनी बँकॉक हून आलेल्या प्रवाशांकडून १२ किलो ४१८ ग्रॅम वजनाचे  अमली पदार्थ जप्त केले. त्याचं मूल्य १२ कोटी रुपयांपेक्षा जास्त  आहे. दुसऱ्या एका प्रकरणात, अधिकाऱ्यांनी शारजाहून आलेल्या तीन प्रवाशांकडून ४० आयफोन १७ प्रो मॅक्स युनिट्स, ३० लॅपटॉप, १२ दारूच्या बाटल्या आणि सिगारेट जप्त केल्या. त्याची किंमत ५६ लाखापेक्षा जास्त आहे. या प्रवाशांना सीमाशुल्क कायदा, १९६२ अंतर्गत अटक करण्यात आली.

<><><><><>

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामना आज भारत आणि ऑस्ट्रेलियामधे होणार आहे. नवी मुंबईतल्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर आज दुपारी दुपारी तीन वाजता सामना सुरू होईल.

गोहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं इंग्लंडवर १२५ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या संघानं ५० षटकांत सात खेळाडू  गमावत ३१९ धावा केल्या. प्रत्युत्तरात इंग्लंडचा संघ केवळ १९४ धावांवर गारद झाला. महिला क्रिकेटमधे दक्षिण आफ्रिकेचा संघ प्रथमच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे.

//<><><><><>//